शासकीय गायरान जमिनी इतर प्रयोजनासाठी मंजूर करण्याबाबत..

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक: जमीन. १०९१/७१३/प्र.क्र. ५९/ज-१,
मंत्रालय, मुंबई: ४०० ०३२.

दिनांक: २८ जून १९९९.

पहा:- १] शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक: जीआरएस. १०७८/२६१६/७७७/ग-६, दिनांक २६.३.१९८४.

२] शासन परिपत्रक क्रमांक महसूल व वन विभाग, क्रमांक: एलएनडी. १०९५/प्र.क्र. ९८/९५/ज-१, दिनांक १८.१२.१९९५.

३] शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्रमांक जमीन. १०९१/७१३/प्र.क्र. ५९/ज-१, दिनांक १४.१२.१९९८.

परिपत्रक :

राज्य शासनाने विहित अटी/ शर्तींच्या अधीन राहून ग्रामपंचायतीकडे शासकीय जमिनी गायरान किंवा गुरचरण म्हणून विहित केलेल्या आहेत. गायरानासाठी ग्रामपंचायतीकडे असलेल्या शासकीय जमिनीच्या वापरासंदर्भात शासन निर्णय, दिनांक २६.३.१९८४ मध्ये धोरण ठरविण्यात आले आहे.

२. शासकीय गायरान जमिनीसंदर्भातील वरील शासन निर्णयातील निर्बंधामुळे ग्रामीण भागात त्या गावच्या मुलभूत नागरी सोयी-सुविधा उदा. पाणीपुरवठा, दवाखाना, शाळा, बांधकामे, दूरसंचार व्यवस्था, उर्जा पुरवठा इत्यादीकरीता जमीन उपलब्ध करुन देणे अडचणीचे ठरत आहे. परिणामत: गावच्या मुलभूत विकासावर विपरीत परिणाम होत आहे. तसेच अशा योजना कार्यान्वित होण्यास मर्यादा येत आहेत. हे विचारात घेऊन शासनाने गायरान जमिनीच्या व्यवस्थापनात व वाटपात सुसूत्रता आणण्याकरीता व गावाच्या मुलभूत गरजांसाठी व घटनेतील ७३ वी दुरुस्ती लक्षात घेऊन ख-या अर्थाने ग्रामपंचायत राज राबविण्यासाठी गायरान जमिनीचा इतर प्रयोजनासाठी वापर करण्यास घातलेली बंधने शिथिल करणे किंवा काढून टाकणे गरजेचे झाले असल्याने खालील अटींच्या अधीन राहून प्रस्तुत प्रयोजनासाठी लागवडीखालील क्षेत्राच्या किमान ५ टक्के गायरान जमिनीबाबतच्या अटी शिथिल करण्यात आल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे :

१. सर्वांगीण ग्रामीण विकासाच्या दृष्टीने मुलभूत नागरी सुविधा, उदा. पाणीपुरवठा, दूरसंचार, दवाखाने, शाळा बांधकाम, उर्जा पुरवठा इत्यादी प्रयोजनाकरीता जमिनीची आवश्यकता असेल आणि त्या ठिकाणी अन्य शासकीय जमीन उपलब्ध नसेल अथवा ज्या प्रयोजनासाठी जमिनीची आवश्यकता आहे त्या प्रयोजनासाठी अन्य कोणतीही जमीन उपयुक्त नसेल तर अशा प्रकरणात प्रस्तुत प्रयोजनासाठी लागवडीखालील क्षेत्राच्या किमान ५ टक्के गायरान जमिनीबाबतच्या अटी शिथिल करुन ती जमीन उपलब्ध करुन घेण्यात यावी. मात्र त्याकरीता स्थानिक ग्रामपंचायतीने तसा सुस्पष्ट उल्लेख करुन ठराव

जिल्हाधिकारी कार्यालय
19 JUL 1999

मंजूर करणे व त्या ठरावावर संबंधित कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची शिफारस असणे आवश्यक राहील.

[२] वरील मुद्दा क्रमांक १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे स्थानिक ग्रामपंचायतीने सुस्पष्ट ठराव केल्यानंतर व त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांची शिफारस प्राप्त झाल्यानंतर जिल्हाधिका-यांनी गायरानाकरीता राखून ठेवलेल्या जमिनी मधून ज्या प्रयोजनासाठी जागेची मागणी केलेली आहे, त्या प्रयोजनासाठी Type land तशाप्रकारची कमीत कमी किती जागा लागेल याची निश्चिती करून घ्यावी. जमीन केंद्र शासनाच्या एखाद्या विभागास/उपक्रमास हवी असल्यास त्या जमिनीची चालू बाजारभावाची किंमत वसूल करून ती रक्कम ग्रामपंचायतीकडे गावाच्या विकास कामासाठी निहित करावी. जमीन शासकीय विभागाच्या किंवा शासनाच्या अंगीकृत उपक्रमासाठी हवी असल्यास शासनाच्या प्रचलित नियमाप्रमाणे/ धोरणाप्रमाणे ती जमीन त्या विभागाकडे निहित करावी/ हस्तांतरीत करावी.

[३] अशा प्रयोजनासाठी जमीन देताना ती केंद्र शासनाच्या किंवा त्यांच्या उपक्रमास द्यावयाची असेल तर जिल्हाधिका-यांकरीता एक हेक्टर व विभागीय आयुक्तांच्या अधिकारात कमाल २ हेक्टर मंजूर करण्याचे अधिकार राहतील.

[४]वरील १ व २ प्रमाणे कार्यवाही करताना जिल्हाधिका-यांनी वन संवर्धन अधिनियम, १९८० मधील तरतूदी तसेच त्याअनुषंगाने विहित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचना न्यायालयीन निर्णयाचा भंग होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक राहील.

[५]केंद्र शासनाला किंवा त्यांच्या उपक्रमांना जमीन मंजूर करताना त्या जमिनीच्या अंतीम मूल्यांकनाची वाट न पहाता त्या जमिनीकरता शासनाने तयार केलेल्या रेडी रेकनरमध्ये दिलेल्या किंमतीचा आधार घ्यावा. यथावकाश त्या जमिनीची किंमत सक्षम अधिका-यांकडून निश्चित करून घेतल्यास तात्पूरती किंमत व अंतिम किंमत यामधील फरकाच्या रकमेवर शासन वेळोवेळी ठरवून देईल त्या दराने व्याज आकारण्यात यावे व आगाऊ ताबा द्यावयाचा झाल्यास संबंधित विभागाकडून त्यासंबंधीचे मुद्रांक पेपरवर हमीपत्र घेण्यात यावे. त्यामध्ये जिल्हाधिकारी ठरवतील त्या अटी व शर्ती मान्य असल्याचा उल्लेखही असावा.

[६] वरीलप्रमाणे जमीन मंजूर करताना जिल्हाधिकारी/ आयुक्त यांना प्रदान केलेल्या वित्तीय शक्तींच्या मर्यादित सदरचा प्रस्ताव असल्यास असे प्रस्ताव शासना-कडे पाठविण्याची आवश्यकता नाही.

३. हे परिपत्रक वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.प्र.क्र. ६८७/व्यय-९, दिनांक १६.६.१९९९ तसेच ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ८०२/९९, दिनांक ८.६.१९९९ च्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ स.शे. पडवेकर ]
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग.

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त.